# ऑनलाईन लैंगिक अत्याचारापासून स्वतः चे संरक्षण कारण्यासाठीची मार्गदर्शन पत्रिका




sflc.in unesco

Guide to Survive- How to Defend Your Online Spaces Against Online Gender Based Violence, 2024
By SFLC.in in partnership with UNESCO

© Copyright 2024 SFLC.in Licensed under Creative Commons BY SA NC 4.0

Published by: SFLC.in
K9, 2nd Floor, Birbal Road, Jangpura Extension, New Delhi – 14, India.

Email: mail@sflc.in

Website: https://www.sflc.in

X: @SFLCin

# ऑनलाईन लैंगिक अत्याचार म्हणजे काय?

लैंगिक अत्याचार म्हणजे एखाद्या व्यक्तिवर तिच्या लिंग आधारित होणाऱ्या हानिकारक कृती. जेव्हा या हानिकारक कृती इंटरनेट मार्फत केल्या जातात त्याला ऑनलाईन लैंगिक अत्याचार म्हणतात.

# ऑनलाईन लैंगिक अत्याचाराचे प्रमुख घटक कोणते?

- **ऑनलाईन घडलेली कृती**
- **लिंगाधारित कृती**
- **हानिकारक कृती:**
  - मानसिक हानी, प्रतिष्ठात्मक हानी, शारीरिक हानी (उदाहरण - शारीरिक छळ)
  - आर्थिक हानी (ऑनलाईन पिळवणूक, वित्तहानी)
  - सामाजिक विलगीकरण (उदाहरण - अब्रुनुकसानी)

**मुख्य व्याख्या:**

**लैगिक अपराधाबाबतच्या बऱ्याच कायदेशीर व्याख्या तुमच्या माहितीस येतील. तुमच्या सोपेपणासाठी आम्ही काही मुख्य व्याख्या खाली मांडल्या आहेत:**

- अश्लील: सामाजिक मर्यादशीलता नुसार / नैतिकते नुसार अतिशय तिरस्करणीय आणि अपमानास्पद कृती
- लैगिक दृष्ट्या अप्रछंद: प्रत्यक्ष किंवा अनुकृत लौंगिक कृती आणि विवस्रपणा/ नग्नता

## ह्या पुस्तिकेची गरज काय आहे? ह्या पुस्तिकेमार्फत वाचकांसाठी खालील तीन मुख्य विषय समजावण्यात आले आहेत:

1. ऑनलाईन लैंगिक अत्याचार म्हणजे काय
2. तुमच्याबरोर होणारा ऑनलाईन  लैंगिक अत्याचार कसा ओळखायचा
3. अपराध्या विरुद्ध तुम्ही कोणती कायदेशीर कारवाई घेऊ शकता

## हि पुस्तिका दोन भागात विभागलेली आहे

**पहिला भाग**

पहिला भाग ऑनलाईन लैंगिक अत्याचारा विषयीची माहिति देतो

**दुसरा भाग**

दुसरा भाग उपलब्ध कायदेशीर उपायांबद्दल माहिती देतो.

# भाग 1: ऑनलाईन लैंगिक अत्याचाराची यादी

खालील यादी हि एखाद्या व्यक्तीवर होणाऱ्या ऑनलाईन लैंगिक अत्याचार ओळखण्यासाठी आणि त्याच्या संबंधातले कायदेशीर परिणाम ओळखण्यासाठी महत्वपूर्ण साधन आहे.

## 1. ऑनलाईन लैंगिक छळ

प्रत्यक्ष शारीरिक लौंगिक छळापाठोपाठ ऑनलाईन लैंगिक छळ

A कोणी तुमच्याशी लैंगिक वक्तव्य करत आहे का?

B कोणी तुमच्याशी शरीर सुखाची मागणी किंवा विनंती केली आहे का?

C ते तुम्हाला अश्लील चित्रपट किंवा चित्र (संभोगदर्शक) पाहायची जबरदस्ती करतायत का?

D ते तुम्हाला लैंगिक स्वरूप असलेले शेरे मारतायत का?

जर वरील A ते D मधली कोणतीही कृती तुमच्या अनुमती शिवाय करण्यात आली असेल तर ती वर्तवणूक लैंगिक छळाच्या अपराधासाठी दोषी ठरेल

**भा.दं.सं., कलम ७५**

लैंगिक छळ: ३ वर्षांपर्यंत कारावास आणि/ किंवा दंड.

लैंगिक टिप्पणी: १ वर्ष कारावास आणि/ किंवा दंड.

लागू: पुरुषांकडून महिलांवर ऑनलाईन केलेल्या अशा वर्तनाला.






## 2. सायबर फ्लॅशिंग (अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करण्याबाबत किंवा पाठवल्याबाबत)

A कोणी तुम्हाला अश्लील मजकूर ऑनलाईन माध्यमातून पाठवत आहे का ?

B अशा मजकूर मध्ये खाजगी चित्र किंवा अश्लील आणि संभोगदर्शक चित्र आहेत का?

C अस मजकूर तुम्हाला तुमच्या अनुमती शिवाय पाठवण्यात आला आहे का?

जर तुमचे उत्तर वरच्या तिन्ही प्रश्नांसाठी सकारात्मक आहे, तर हि सायबर फ्लॅशिंग ची केस असण्याची शक्यता आहे

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६७**

पहिला अपराध - तीन वर्ष कारावास आणि पाच लाखापर्यंतचा द्रव्य दंड

दुसऱ्या किंवा त्यानंतरचा अपराध - पाच वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६७ अ**

पहिला अपराध - पाच वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड

दुसऱ्या किंवा त्यानंतरचा अपराध - सात वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड

कोणतीही व्यक्ती जिला हा अनुभव आला आहे तिला हा कायदा लागू होतो

## 3. सायबरस्टॉकिंग

**A** कोणी तुमच्याशि वारंवार ऑनलाईन संपर्क साधायचा किंवा बोलण्याचा प्रयत्न करत आहे का?

**B** तुमची या व्यक्तीशी बोलण्याची इच्छा नसल्याचे स्पष्टपणे दर्शवल्यानंतरहि व्यक्ती तुमच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत आहे का ?

**C** तुमच्या मते अशी व्यक्ती तुमच्यावर इंटरनेट च्या माध्यमातून लक्ष ठेवून आहे का?

**D** तुम्हाला एखाद्या गुन्ह्यापासून वाचवण्यासाठी अशा प्रकारचा संपर्क साधण्यात आला होता का? तुमच्या माहिती नुसार, संपर्क साधणाऱ्या व्यक्ती कडे गुन्हा प्रतिबंध करण्याची आणि गुन्हा तपास करण्याची जबाबदारी राज्याने सोपवली होती का? (पोलीस)

**E** जर ऑनलाईन पाठलाग करणारी व्यक्ती गुन्हा तपास करण्याचा आव आणत असेल तर तुम्ही त्यांचे ओळखपत्र मागितलेत का? अशाप्रकारे ओळखपत्र मागणे हे अनिवार्य नसले तरी अशा पाठलाग करणाऱ्या पोलीस अफसाराची ओळख तपासणे उचित ठरेल

जर तुम्ही वरील A, B, C क मुद्द्यांशी सहमत आहात तर हे सायबेरस्टॉकिंगचे उदाहरण आहे. जर तुम्ही D मुद्द्याशी सहमत आहात आणि तुमचा ऑनलाईन पाठलाग करण्यामागे कायदेशीर उद्देश असेल तर असा प्रसंग सायबेरस्टॉकिंग म्हणून ओळखला न जाण्याची शक्यता आहे.

**बीएनएस, कलम ७८ (१) (ii)**

प्रथम गुन्हा: ३ वर्षे कारावास + दंड.
पुनरावृत्तीचा गुन्हा: ५ वर्षे कारावास + दंड.

लागू: पुरुषांकडून सायबर स्टॉकिंगला बळी पडणाऱ्या महिलांसाठी.

## 4. तुमच्या अनुमतीशिवाय तुमची खाजगी छायाचित्रे किंवा चलचित्राचा (व्हिडिओ) प्रसार.

**A** कोणी तुमचे खाजगी छायाचित्र किंवा चलचित्र ऑनलाईन पसरवत आहे का?

**B** हा प्रसार तुमच्या अनुमती विरुद्ध होत आहे का?

**C** अशी प्रसार करणारी व्यक्ती तुमचा सद्य किंवा पूर्व प्रेमी आहे का? (हा मुद्दा अनिवार्य नाही)

जर तुम्ही मुद्दा A आणि B शी सहमत असाल तर हे अनुमतीशिवाय तुमची खाजगी छायाचित्रे किंवा चलचित्राचा (व्हिडिओ) प्रसार करण्याचे उदाहरण आहे

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलाम ६६ इ**


तीन वर्ष कारावास आणि दोन लाखापर्यंतचा द्रव्य दंड

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलाम ६७ अ**

पहिला अपराध - पाच वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड
दुसऱ्या किंवा त्यानंतरचा अपराध - सात वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड

जर अपराधी व्यक्ती तुमची सद्य किंवा पूर्व प्रेमी असेल तर असे कृत्य सूड घेण्याचे उदाहरण ठरू शकते. अशा प्रसंगी, हा गुन्हा प्रेमी द्वारा हिंसे चे उदाहरण ठरू शकते. जेव्हा तुम्ही अशा सुडाचे बळी ठरत तेच हे जाणणे महत्वाचे आहे कि तुमची स्वत:ची या प्रसंगात काहीही चूक नाहीये. सर्वप्रथम तुम्ही तुमच्या जवळच्या विश्वासार्ह्य व्यक्तींशी आधारासाठी बोलावे.

हा कायदा प्रत्येक व्यक्ती जिला असा अनुभव आला असेल तिला लागू होतो



5. **डॉक्सिन्ग**

A तुम्हाला तुमची व्यक्तिगत माहिती - छायाचित्रे, चलचित्रे, इलेक्ट्रॉनिक संदेश, घरचा पत्ता, फोन नंबर,आरोग्याबाबतची माहिती - जी तुम्ही गुप्त ठेवली आहे, ती तुम्हाला ऑनलाईन माध्यमांवर मिळाली का?

B वरील प्रसंग तुमच्या अनुमती शिवाय झाला का?

C अशी व्यक्तिगत माहिती तुमच्या विरुद्ध वापरण्यात येत आहे का? अश्या माहितीचा उपयोग घन कोणी तुमचा छळ करण्याचा प्रयत्न करताय का?

जर तुम्ही वरच्या सगळ्या मुद्द्यांशी सहमत असाल तर हे डॉक्सिन्ग चे उदाहरण आहे

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६७ अ**

पहिला अपराध - पाच वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड

दुसऱ्या किंवा त्यानंतरचा अपराध - सात वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६ इ**

तीन वर्ष कारावास आणि दोन लाखापर्यंतचा द्रव्य दंड

**बीएनएस, कलम ३५६ (१ आणि २)**

२ वर्षे कारावास आणि/किंवा दंड/दोन्ही/ सामाजिक सेवा सहित

लागू होते: हे अनुभवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस.

6. **मॉर्फिंग/ट्रांसमोगरीफिकेशन**

A तुम्हाला तुमची छायाचित्रे संपादित रूपात (उदाहरण - तुमचा चेहरा दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरावर/ प्रसंगात संपादित करून भ्रम निर्माण करणे) इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर सापडली आहेत का?

B अश्या प्रकारचे संपादन आणि प्रसारण तुमच्या अनुमती शिवाय करण्यात आले आहे का?

C संपादित छायाचित्रे अश्लील आणि लैगिक आहेत का?

D असे संपादित छायाचित्र कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून निर्माण केले असल्याची शक्यता आहे का?

जर तुम्ही A ते C मुद्द्यांशी सहमत असाल तर हे मॉर्फिंग चे उदाहरण असू शकते

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६ इ**

तीन वर्ष कारावास आणि दोन लाखापर्यंतचा द्रव्य दंड

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६७ अ**

पहिला अपराध - पाच वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड

दुसऱ्या किंवा त्यानंतरचा अपराध - सात वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६ ड**

तीन वर्ष कारावास आणि एक लाखापर्यंतचा द्रव्य दंड

हा कायदा सर्व व्यक्तींसाठी लागू होऊ शकतो

## 7. वोयेउरीसम

**A** तुमच्या अनभिज्ञ तुमची छायाचित्र आणी चलचित्र काढण्यात आली आहेत का?

**B** अशा छाया/चल चित्र खाजगी वेळी काढण्यात आले होते का?

**C** तुम्ही असे छायाचित्र किंवा चलचित्र काढण्यास अनुमती दिल्यानंतर असे तुमच्या अनुमती शिवाय त्याचा ओंलीने ऑनलाईन माध्यमांवर प्रसार झाला आहे का ?

जर तुम्ही वरील तीनही मुद्द्यांशी सहमत असाल तर हे वोयेउरीसम चे उदाहरण असू शकते

**बीएनएस, कलम ७७**

प्रथम गुन्हा: १ वर्ष ते ३ वर्षांपर्यंत कारावास + दंड.

पुन्हा गुन्हा केल्यास: शिक्षा ७ वर्षांपर्यंत वाढू शकते + दंड.

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलाम ६७**

पहिला अपराध - तीन वर्ष कारावास आणि पाच लाखापर्यंतचा द्रव्य दंड

दुसऱ्या किंवा त्यानंतरचा अपराध - पाच वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड

लागू होते: पुरुषांकडून याच्या अधीन गेलेल्या महिलांना.

## 8. ऑनलाईन लैंगिक छळ

**A** तुमच्या इच्छे विरुद्ध कोणी तुम्हाला तुमचे कपडे काढण्याची जबरदस्ती करत आहे का? जर तुम्ही अशा जबरदिस्ती करणाऱ्या व्यक्तीचे बोलणे ऐकले नाही तर ती व्यक्ती तुम्हाला दुखापत पोचवेल अशी भीती तुम्हाला वाटत आहे का?

**B** अशी जबरदस्ती तुम्हाला इंटर्नेट च्या माध्यमातून होत आहे का?

**C** कोणी तुमच्याशी लैंगिक शरीर सुखाची मागणी किंवा जबरदस्ती, करत आहे का? जबरदस्ती बरोबर तुम्हाला हानी पोचवण्याची धमकी देण्यात येत आहे का? जर तुम्ही ह्या व्यक्तीची मागणी पूर्ण नाहि केली तर तुमची खाजगी माहिती, छायाचित्रे, चलचित्रे इंटरनेट च्या माध्यमातून लोकांपर्यंत पसरवण्याची धमकी देण्यात आली आहे का?

जर तुम्ही वरील सर्व मुद्द्यांशी सहमत असाल तर हे ऑनलाईन लैंगिक छळाचे उदाहरण आहे

**भा.दं.सं., कलम ७४**

१-५ वर्षांची कारावासाची शिक्षा + दंड

**बीएनएस, कलम ३५१ (२)**

धमकी: २ वर्षे/दंड/दोन्ही

**बीएनएस, कलम ३५१ (३)**

मृत्यूची धमकी: ७ वर्षे/दंड/दोन्ही

**बीएनएस, कलम ३५१ (४)**

अज्ञात धमकी: २ वर्षे/दंड/दोन्ही



लागू होते: कोणीही, परंतु कलम ७४ फक्त महिलेसाठी उपलब्ध आहे.

## 9. लिंग आधारित द्वेषयुक्त भाषण

**A** तुम्ही कधी ऑनलाईन हानिकारक, हिंसक, भेदभावात्मक, आणि लिंग आधारित अपमानास्पद भाष्याचे लक्ष्य ठरला आहेत का? तुमच्या मते अशा भाष्याचे प्रमुख कारण तुमचे लिंग आहे का?

**B** अशा भाष्यामुळे तुम्हाला शाररिक व मानसिक हानी , अब्रुनुकसानी किंवा वित्तहानी होण्याची शक्यता आहे का?

**C** अश्या कोणत्याही भाष्याद्वारे तुम्हाला गंभीर दुखापत पोचवण्याचा किंवा तुमचा खून करण्याच्या धमक्या तुम्हाला दिल्या जात आहेत का?

जर तुम्ही A आणि B मुद्द्याशी सहमत असाल तर हा प्रसंग लिंग आधारित द्वेषयुक्त भाषणाचे उदाहरण आहे.

**बीएनएस, कलम ३५६**

२ वर्षे कारावास आणि/किंवा दंड.

**बीएनएस, कलम ३५१ (२)**

धमकी: २ वर्षे/दंड/दोन्ही

**बीएनएस, कलम ३५१ (३)**

मृत्यूची धमकी: ७ वर्षे/दंड/दोन्ही

**बीएनएस, कलम ३५१ (४)**

अज्ञात धमकी: २ वर्षे/दंड/दोन्ही

**भा.दं.सं., कलम ७९**

३ वर्षे कारावास + दंड

लागू: कोणीही, परंतु कलम ७९ फक्त महिलांसाठी आहे.



## 10. ओळख चोरी

A तुमचा पासवर्ड, इलेक्ट्रॉनिक सही किंवा इतर कोणती महत्वाची वैयक्तिक माहिती वापरून कोणी ऑनलाईन तुमचे सोंग घेण्याचा प्रयत्न केला आहे का?


B कोणी अशी माहिती वापरून फसवणूक करण्याचा प्रयत्न केला आहे का? उदाहरण - तुमची माहिती वापरून तुमच्या नावामागे नवीन कर्ज घेणे

जर तुम्ही वरील पैकी कोणताही मुद्द्याशी सहमत असाल तर हे ओळख चोरीचे उदाहरण आहे.

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलाम ६६ क**

तीन वर्ष कारावास आणि एक लाखापर्यंतचा द्रव्य दं

हा कायदा सगळ्यांना लागू होतो



## 11. अल्पवयीन व्यक्तीविरुद्ध गुन्हा

A इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे कोणतेही छायाचित्र किंवा माहिती निर्माण करण्यात आली आहे का?

B अश्या प्रकारची कोणतीही माहिती गोळा केली जात्ये का?

C अशी माहिती अल्पवयीन मुलांबद्दल आहे का?

D अशा प्रसंगी अल्पवयीन मुलांना लैंगिक किंवा अश्लील पद्धतीने दाखवण्यात आले आहे का?

जर वरील सर्व मुद्यांशी तुम्ही सहमत असाल तर हे अल्पवयीन व्यक्तीविरुद्ध गुन्ह्याचे उदाहरण आहे.

E वरील माहिती जाहिराती मार्फत लोकांमध्ये वाटली जात आहे का?

F वरील माहिती लोकांमार्फत डाउनलोड केली जात आहे का?

G वरील माहिती इंटरनेट वर शोधली जात आहे का?

H अल्पवयीन मुलांना ऑनलाईन नातेसंबंधात यायचे प्रोत्साहन दिले जात आहे का? जे नातेसंबंध कोणत्याही समजूतदार व्यक्तीला अपमानास्पद वाटू शकते का?

I अशा माहितीचा करण्यात येत आहे का?

जर वरील A ते D मधील कोणताही मुद्द्याशी तुम्ही सहमत असाल तर अशी कृती माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलाम ६७बी च्या अंतर्गत दंडनीय गुन्हा म्हणून ओळखला जाईल.

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलाम ६७ ब**

पहिला अपराध - पाच वर्ष कारावास आणि दहा लाखापर्यंतचा द्रव्य दंड
दुसऱ्या किंवा त्यानंतरचा अपराध - सात वर्ष कारावास आणि सात लाखापर्यंतचा द्रव्य दंड

सगळ्या मुलं मुलींना हा कायदा लागू होतो

# भाग 2: अन्याया विरुद्ध साधन

## मी आता काय करू शकतो?

### ➡ प्रत्येक गोष्टीची नोंद ठेवा



प्रत्येक संवादचा, प्रत्येक वेबसाइट ज्यावर माहिती सापडली त्याचा इलेक्टोनिक पत्ता, प्रत्येक प्रसंगाच्या तारखा आणि त्या संबंधातील प्रत्येक आनुषंगिक माहिती पुरावा म्हणून उपयोगी येऊ शकते. म्हणून अशा प्रकारचे सर्व पुरावे बारकाईने गोळा करून ठेवा

### ➡ तक्रार नोंदवा

- ज्या ऑनलाईन वेबसाइट वर तुम्हाला अशी माहिती दिसली त्यावर तक्रार नोंदवण्याचा पर्याय आहे का नाही ते बघा. या पर्यायामार्फत तुम्ही सोशल मीडिया माध्यमांवरून अशी माहिती काढून घेऊ शकता. तक्रार नोंदवतांना तुम्ही तुमच्या तक्रारींचे अश्लील, छळवादी, हानिकारक अशा बऱ्याच प्रकारे वर्गीकरण करू शकता. भारतीय न्यायव्यवस्थेनुसार सोशल मीडिया माध्यमांना तुमची तक्रार स्वीकार करणे सक्तीचे असून त्यांना २४ तासात योग्य तोड काढणे भाग आहे. स्वतःबरोबर विश्वासातल्या मित्रांना आणि कुटुंबियांना पण सारखी तक्रार नोंदवायला सांगा. अशा तक्रारीसोबत, ज्या ऑनलाईन खात्याद्वारे अशी माहिती तुमच्यासमोर आली त्या खात्याला ब्लॉक करायला विसरू नका जेणेकरून अशा खात्याद्वारे कोणीही तुम्हाला पुन्हा संबंध साधू नाही शकणार.

- तुमच्या तक्रारी बाबत चा निर्णय तुम्हाला तुमच्या खात्यावर कळवण्यात येईल. जर तुम्ही त्या निर्णयाबाबत समाधानी नसाल तर तुम्ही या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची याचिका करू शकता

- जर या याचिकेनंतरही तुम्हाला असे वाटत आहे कि सोशल मीडिया माध्यमांनि तुमच्या तक्रारींवर चुकीचा निर्णय घेतला आहे तर तुम्ही सरकारच्या तक्रार याचना समिती कडे तक्रार नोंदवू शकता - https://gac.gov.in/

- सरकारी तक्रार याचना समितीच्या कार्यपद्धती जाणून घेण्यासाठी आणि तुमची तक्रार कशाप्रकारे हाताळली जाईल हे समजून देण्यासाठी सरकारने एक प्रश्नावली निर्माण केली आहे. हि प्रश्नवली वाचून घेणे उचित आहे कारण ह्या समितीचा निर्णय हा अंतिम असतो.

(https://gac.gov.in/CMSData/FAQsqs=+WcLOPiE4QBLh0NRiMqmqQ==

- सरकारने राष्ट्रीय सायबर गुन्हा नोंदणी साठी ऑनलाईन माध्यम सुरु केले आहे. तुम्ही या माध्यमात खालील लिंक वरून पोचू शकता
(https://cybercrime.gov.in/Webform/crmcondi.aspx )

राष्ट्रीय सायबर गुन्हा नोंदणीचा हेल्पलाईन नंबर १९३० आहे. महिलांसाठी चा हेल्पलाईन नंबर १८१ आहे.

राष्ट्रीय सायबर गुन्हा नोंदणीआधी त्याची प्रश्नवली वाचावी:
(https://cybercrime.gov.in/Webform/FAQ.aspx )

आमच्या सल्ल्यानुसार तुम्ही तक्रार लवकरात लवकर नोंदवावी. जर पुढे तुम्ही पोलिसांकडे फआईआर नोंदविण्याचा निर्णय घेतलात तर पोलीस तुम्हाला वरील तक्रारींबद्दल विचारतील. तुम्ही दोन्ही तक्रार एकमेका नोंदवू शकता.

## फआई आर ची नोंद करावी

- जर तुम्हाला पोलिसांकडे फआई आर ची नोंद करायची असेल तर तुम्ही तुमच्या जवळच्या पोलीस स्टेशन मध्ये किंवा शहराच्या सायबर गुन्हा युनिट कडे जाऊ शकता. ह्या ऑफिसेस चा पत्ता ऑनलाईन (गुगल मॅप) मिळू शकतो. जर पोलिसांनी तक्रार दाखल करण्यापासून नाउमेद केले तर तुम्ही त्यांना पुन्हा सांगून तक्रार नोंद करायला भाग पाडा. तुम्ही पोलिसांना असा स्पष्ट करा कि कायद्यानुसार ज्या काही गोष्टी करणे गरजेचे होते त्या सगळ्या गोष्टी तुम्ही बेचूक केल्या आहेत.




- बीएनएसएसच्या कलम १७३ अंतर्गत, कोणत्याही पोलिस अधिकाऱ्यास गुन्ह्याची माहिती/तक्रार नोंदवणे बंधनकारक आहे, गुन्हा कोणत्या कार्यक्षेत्रात घडला आहे याची पर्वा न करता. तक्रार ऑनलाइन देखील दाखल करता येऊ शकते.

- तुमच्याकडे दुसऱ्या पोलीस स्टेशन मध्ये जाऊन फआई आर नोंद करण्याचा पर्यायही आहे. जरी तुम्ही त्या पोलीस स्टेशनच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर असाल तरी ते तुमची फआई आर नोंद करू शकतात आणि नंतर संबंधित पोलीस स्टेशन मध्ये ट्रान्सफर करू शकतात. ह्यालाच zero फआई आर असेही म्हंटले जाते. जर दुसऱ्या पोलीस स्टेशन मध्ये सुद्धा फआई आर नोंदवली नाही गेली तर तुम्ही तुमच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याकडेही जाऊन तक्रार नोंदवू शकता.

**लक्षात ठेवा कि तक्रार नोंदवणी हा तुमचा कायदेशीर अधिकार आहे.**

- फआई आर नोंदवतांना पूर्ण प्रसंग जसा झाला तसा लिहून सादर करा. तुम्ही पोलीस ऑफिसरला प्रसंग तोंडी हि सांगू शकता आणि पोलीस ऑफिसर तो प्रसंग लिहून घेतील. प्रत्येक बारीक माहिती सादर करा. जर तुम्ही प्रसंग तोंडी सांगितलात तर त्याची नीट नोंद झाली आहे ह्याची तपासणी करा. पोलीस ऑफिसरला त्याची नोंद मोठ्याने वाचायला तुम्ही सांगू शकता. तुम्ही नोंदवलेल्या फआई आर ची अधिकृत छाप्यासाहित (छापावर पोलिसांचा डायरी नंबर - DD No असेल) कॉपी घ्यायला विसरू नका. फआई आर नंबर, दिनांक आणि पोलीस स्टेशन चे नाव नोंद करून ठेवा. एकदा फआई आर ची नोंद झाली कि पोलीसाना तपस करणे जरुरी आहे.



# परिशिष्ट

**बीएनएस - भारतीय न्याय संहिता**
**बीएनएसएस - भारतीय नागरिक सुरक्षा संहिता**
**आयटी अधिनियम, २००० - माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २०००**

**बीएनएस, कलम ३५६ (१-४)**
गुन्हेगारी बदनामीशी संबंधित, अशा व्यक्तींना शिक्षा देते जे (बोलून किंवा लेखी स्वरूपात) दुसऱ्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्याचा हेतू ठेवतात किंवा त्यांच्या कृतींमुळे त्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचेल हे जाणूनबुजून करतात.

**बीएनएस, कलम ७४**
महिलांचा शोषण आणि जबरदस्तीने आर्थिक फायदा उठवणे: जो कोणी एखाद्या महिलेवर हल्ला करतो किंवा तिला अशा प्रकारे वागण्यास भाग पाडतो, ज्यामुळे तिच्या शीलाचा अपमान होईल, त्याला शिक्षा केली जाते.

**बीएनएस, कलम ७५**
जे वर्तन लैंगिक छळ म्हणून पात्र ठरते त्याची व्याख्या करते आणि त्यासाठी शिक्षा ठरवते.

**बीएनएस, कलम ७७**
कोणताही पुरुष जो गुप्तपणे किंवा जबरदस्तीने एखाद्या महिलेचा खाजगी कृती करताना फोटो किंवा प्रतिमा घेतो, त्याला शिक्षेस पात्र ठरवते. तसेच, कोणताही पुरुष जो या घेतलेल्या प्रतिमा महिलेच्या संमतीशिवाय शेअर करतो किंवा वितरीत करतो, त्यालाही शिक्षेस पात्र ठरवते.

**बीएनएस, कलम ७८**
हे पाठलाग करण्याच्या गुन्ह्याशी संबंधित आहे. आयपीसी ३५४डी हे प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक संवाद किंवा एखाद्या व्यक्तीच्या ऑनलाइन क्रियाकलापांच्या निरीक्षणाच्या संदर्भात पाठलाग करण्याच्या कृत्याला गुन्हेगार ठरवण्यासाठी आणले गेले.

**बीएनएस, कलम ३५१(१)**
गुन्हेगारी धमकी संदर्भात: म्हणजेच, दुसऱ्या व्यक्तीला, त्यांच्या प्रतिष्ठेला किंवा त्यांच्या मालमत्तेला हानी पोहोचवण्याची धमकी देणे.

**बीएनएस, कलम ३५१(४)**
अज्ञात संप्रेषणाद्वारे एखाद्या व्यक्तीला, त्यांच्या प्रतिष्ठेला किंवा त्यांच्या मालमत्तेला हानी पोहोचवण्याची धमकी देणे यासंबंधीचा गुन्हेगारी भयप्रदर्शनाचा विषय हाताळते.

**बीएनएस, कलम ७९**
महिलांच्या लज्जेस धक्का लावणारे किंवा त्यांच्या गोपनीयतेचा भंग करणारे कृत्य दंडनीय आहे.

# परिशिष्ट

**विभाग 173(4) - भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023**
(4) कोणत्याही पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने उपविभाग (1) मध्ये उल्लेख केलेली माहिती नोंदवण्यास नकार दिल्यास, त्यामुळे बाधित झालेल्या व्यक्तीला अशी माहिती लेखी स्वरूपात आणि टपालाद्वारे संबंधित पोलिस अधीक्षकांकडे पाठविण्याचा अधिकार आहे.
संबंधित पोलिस अधीक्षक, जर समाधान पावले की अशा माहितीत कोणतेही संज्ञेय गुन्ह्याचे निदर्शन होते, तर ते स्वतः प्रकरणाची चौकशी करू शकतात किंवा त्यांच्या अधीन असलेल्या कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला या संहितेनुसार चौकशी करण्याचे निर्देश देऊ शकतात. अशा अधिकाऱ्यास त्या गुन्ह्याच्या संदर्भात पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या सर्व अधिकार प्राप्त होतील.
जर वरीलप्रमाणे काहीही झाले नाही, तर बाधित व्यक्तीला न्यायाधीशांकडे अर्ज करण्याचा अधिकार असेल.

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६ क**
हे कलम ओळख चोरीसाठी आहे. हे कलम विशिष्टरीत्या ओळख चोरीच्याद्वारे दुसऱ्या व्यक्तीला हानी पोचवणाऱ्या लोकांसाठी आह

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६ ड**
दुसऱ्या व्यक्तीचे ढोंग घेऊन संगणकाच्या माध्यमाने फसवणुकीवर शिक्षा देण्यासाठी ह्या कलमाचा उपयोग होतो

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६ इ**
कोणत्याही व्यक्तीच्या अनुमती शिवाय त्यांचे छायाचित्र इंटरनेट वर प्रसार केल्यास ते या कलमांतर्गत शिक्षेसाठी पात्र ठरतात.

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६७**
अश्लील माहिती ऑनलाईन माध्यमात पसरवली तर या कलमाद्वारे शिक्षेसाठी पात्र होते

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६७ अ**
लैगिंक आणि अश्लील माहिती इंटरनेट च्या माध्यमातून पसरवल्यास ह्या कलमाच्या द्वारे शिक्षा होते.

वरील दोन कलाम लैंगिक आणि अश्लील ह्या दोन शब्दांच्या आधारे गुन्हेगाराला गंभीर शिक्षा देतात. परंतु लैंगिक आणि अश्लील ह्या दोन्ही शब्दांची व्याख्या हि व्यक्तिगत आहे. त्यामुळे बऱ्याचदा ह्या दोन कलमांचा दुरपोयोग घेण्याची शक्यता असते. हे कलाम अनुमती सहित आणि अनुमती निहाय प्रसंगामध्ये फरक ठेवत नाहीत.

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६७ ब**
ह्या कलमाद्वारे अल्पवयीन व्यक्तींची अश्लील किंवा लैंगिक माहिती पसरवणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी उपयोगी आहे.




sflc.in unesco